ग्रंथालय संचालनालय, मुंबई व संचालनालयाच्या अधिपत्याखालील कार्यालयातील अस्थायी पदे पुढे चालू ठेवणेबाबत.

महाराष्ट्र शासन
उच्च व तंत्र शिक्षण विभाग
शासन निर्णय क्रमांक : मराग्रं-२५११/प्र.क्र. ४५ /२०१७/साशि-५
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२,
दिनांक: ०८ मार्च, २०१९.

वाचा :

१) शासन निर्णय, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, क्रमांक : मराग्रं-२५११/प्र.क्र.४५/२०१७/साशि-५, दि.०१/१०/२०१८.
२) शासन निर्णय, वित्त विभाग, क्र. पदनि-२०१६/प्र.क्र.०८/१६/आ.पू.क. दि.२१/०२/२०१९.
३) ग्रंथालय संचालकांचे पत्र क्र.१४/२०१८-१९/१९४३७, दि.२५/०२/२०१९.

शासन निर्णय :

ग्रंथालय संचालनालय व त्यांच्या अधिपत्याखालील कार्यालयांतील एकूण १४२ अस्थायी पदे दि. ०१.१०.२०१८ ते २८.०२.२०१९ पर्यंत पुढे चालू ठेवण्यास संदर्भ क्र.१ अन्वये मान्यता देण्यात आलेली आहे. संदर्भ क्र.२ अन्वये अस्थायी पदांना दि.०१.०३.२०१९ ते दि.३०.०९.२०१९ पर्यंत मुदतवाढ देण्याचे अधिकार प्रशासकीय विभागांना प्रदान करण्यात आले आहेत. त्यानुषंगाने ग्रंथालय संचालनालय व त्यांच्या अधिपत्याखालील कार्यालयांतील अस्थायी पदे दि.०१.०३.२०१९ पासून दि. ३०.०९.२०१९ पर्यंत पुढे चालू ठेवण्यास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव ग्रंथालय संचालकांचे संदर्भ क्र.३ अन्वये शासनास प्राप्त झाला आहे.

२. ग्रंथालय संचालनालय व त्यांच्या अधिपत्याखालील कार्यालयांतील सोबतच्या **विवरणपत्र "अ"** मध्ये दर्शविलेली १४२ अस्थायी पदे, दि.०१.०३.२०१९ ते दि.३०.०९.२०१९ पर्यंत पुढे चालू ठेवण्यास खालील अटींच्या अधीन राहून मान्यता देण्यात येत आहे.

१) सदर पदे ज्या प्रयोजनासाठी निर्माण केली आहेत, त्याच प्रयोजनासाठी चालू ठेवण्यात आली आहेत.
२) ग्रंथालय संचालनालयाकडे असलेल्या विद्यमान योजनांपैकी कोणतीही योजना संपलेली नाही.

३. यासंदर्भात होणारा खर्च खालील मुख्यलेखाशिर्षांखाली मंजूर असलेल्या तरतुदीतून भागविण्यात यावा. मागणी क्र. डब्ल्यू-४, २२०५- कला व संस्कृती, १०५, सार्वजनिक ग्रंथालये,

(अ) (०१) (०१) ग्रंथालय संचालनालय (२२०५ ०२५१)
(ब) (०२) (०१) शासकीय मध्यवर्ती, विभागीय व जिल्हा ग्रंथालये (२२०५ ०२७१)
(क) (०२) (०२) शासकीय मध्यवर्ती, विभागीय व जिल्हा ग्रंथालये (२२०५ ०२८९)

४. सदर शासन निर्णय हा शासन निर्णय, वित्त विभाग, क्र. पदनि २०१६/ प्र.क्र.८/ १६/ आ.पू.क., दि.२१/०२/२०१९ च्या शासन निर्णयान्वये प्रशासकीय विभागांना प्रदान करण्यात आलेल्या अधिकारानुसार निर्गमित करण्यात येत आहे. सदर शासन निर्णयातील निर्देशानुसार ग्रंथालय संचालनालय व त्या अधिपत्याखालील कार्यालयातील आस्थापनेवरील पदांचा आढावा घेऊन सुधारित आकृतीबंधास उच्चस्तरीय समितीची मान्यता घ्यावी.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०३०८१४४५०५५७०८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

Anil Vithalrao Saware

Digitally signed by Anil Vithalrao Saware
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Higher And Technical Education Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=073348b7a8767f0f7865422df1e65ce2f3bcdf6786e4712e2c088a9ac4ffee3f, cn=Anil Vithalrao Saware
Date: 2019.03.08 14:47:33 +05'30'

(अनिल वि.सावरे)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

सोबत : विवरणपत्र "अ"

प्रति,

१.महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र १/२, मुंबई / नागपूर.
२.ग्रंथालय संचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
३. सर्व ग्रंथपाल, ग्रंथपाल-गट-अ, राज्य मध्यवर्ती ग्रंथालय, नगर भवन, मुंबई
४.सर्व सहाय्यक ग्रंथालय संचालक.
५.ग्रंथपाल, शासकीय विभागीय ग्रंथालय, पुणे/नागपूर/अमरावती/औरंगाबाद/ नाशिक/ रत्नागिरी
६. ग्रंथपाल, शासकीय जिल्हा ग्रंथालय, मुंबई उपनगर, ठाणे, रायगड,रत्नागिरी,नाशिक,धुळे, पुणे, कोल्हापूर, जालना, मुंबई शहर, सातारा, बीड, नांदेड,
७. ग्रंथपाल, डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मृती ग्रंथालय, दापोली
८. जिल्हा ग्रंथपाल, शासकीय जिल्हा ग्रंथालय, यवतमाळ, चंद्रपूर
९. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
१०.जिल्हा कोषाधिकारी, पुणे, नागपूर, अमरावती, औरंगाबाद, नाशिक, रत्नागिरी, यवतमाळ, चंद्रपूर, रायगड, धुळे, कोल्हापूर, जालना, दापोली, मुंबई शहर, सातारा, बीड, नांदेड
११.उपकोषागार अधिकारी, कोकण भवन, नवी मुंबई, ठाणे, कोकण भवन, नवी मुंबई
१२.निवासी लेखा अधिकारी, मुंबई
१३.वित्त विभाग (अर्थसंकल्प १९),(व्यय-५), मंत्रालय, मुंबई
१४.कार्यासन अधिकारी, साशि-१, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई
१५.निवडनस्ती साशि-५.

विवरणपत्र "अ"

(शासन निर्णय क्रमांक: मराग्रं- २५११/प्र.क्र. ४५/२०१७/साशि-५, दि: ०८ मार्च, २०१९ चे सहपत्र)

अ. क्र	वर्ग/गट	संवर्ग/पदनाम	मंजूर पदांची संख्या	स्थायी पदांची संख्या	अस्थायी पदांची संख्या
१	गट-अ राजपत्रित	ग्रंथालय संचालक	१	१	--
२		ग्रंथालय उपसंचालक / ग्रंथपाल वर्ग १	४	३	१
३	गट-ब राजपत्रित	सहाय्यक ग्रंथालय संचालक/ ग्रंथपाल वर्ग २/ हस्तलिखित अधिकारी/ लेखाधिकारी/ जिल्हा ग्रंथालय अधिकारी	४५	२४	२१
४	गट-क	जिल्हा ग्रंथपाल/ तांत्रिक सहाय्यक/ग्रंथालय निरिक्षक/ वितरण सहाय्यक	८४	५६	२८
५		अधिक्षक/लघुलेखक	४	४	--
६		मुख्य लिपिक	१४	११	३
७		वरिष्ठ लिपिक	३६	२९	७
८		निर्गम सहाय्यक	१६	१३	३
९		कनिष्ठ लिपिक	९६	६५	३१
१०		वाहन चालक	९	७	२
११	गट-ड	आलमारी परिचर/ग्रंथ परिचर/ पृथ:कार/नाईक/ग्रंथवाहक/ग्रंथ बांधणीकार	४०	३२	८
१२		शिपाई/ चौकीदार/हमाल/ माळी/ सफाई कामगार	१३२	९४	३८
एकूण			**४८१**	**३३९**	**१४२**